वन संरक्षक
कार्य आयोजना विभाग
अमरावती यांचे कार्यालय
आवक क्रमांक 496
दिनांक 14-3-2016


# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकार्यालय

**"वनभवन" रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१**

Email- apccfhrmadmn@gmail.com Office land line No 0712 2556792 Fax No 0712 2550675


ई-मेलव्दारे

क्र: कक्ष-१०(अ)२/आस्था/से.नि./प्र.क्र. (१५-१६)/९६३ /१५-१६
नागपूर - ४४० ००१ दिनांक ३ /०३/२०१६

9 MAR 2016
लेखा (ब)

विषय :- सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना उपदानाचे प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २२ एप्रिल, १९९३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २३ जानेवारी १९९३

वन संरक्षक कार्य आयोजना अमरावती

विषयांकित प्रकरणी, मुख्य वनसंरक्षक (सर्व), कार्यात्मक / अकार्यात्मक यांचे लक्ष उपरोक्त संदर्भिय राजपत्राकडे वेधण्यांत येत आहे. (प्रत संलग्न)

२.०० सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द सुरू करण्यात आलेली अथवा प्रस्तावित असलेल्या विभागीय चौकशीचे अनुषंगाने त्यांना देय असलेले सेवा उपदान प्रदानाबाबत भारताच्या सविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन), नियम १९८२ मध्ये काही सुधारणा व नियम खालील प्रमाणे केलेले आहेत.

१. या नियमास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) (सुधारणा) नियम १९९३ असे म्हणावे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १३० मधील पोटनियम (१) मधील खंड (सी) नंतर खालील परंतुक जोडण्यात यावा.

मात्र जेथे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल), नियम १९७९ च्या नियम १० अन्वये, त्या नियमातील नियम ५ मधील खंड (१) च्या उपखंड (एक) (दोन) आणि (चार) मध्ये नमुद केलेल्या किरकोळ शिक्षांपैकी एखादी शिक्षा बजावण्यासाठी विभागीय चौकशी सूरू केली असेल, तेथे शासकीय कर्मचा-यास उपदानाचे प्रदान प्राधिकृत करण्यात येईल.

३.०० तरी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द नियम १० अंतर्गत सुरू असलेल्या विभागीय चौकशीचे प्रकरणी या पुढे उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपले अधिनस्थ कार्यालयास नियमातील तरतुदींचे अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत सुचित करण्यात यावे. सदर कार्यवाही आपले स्तरावरुन तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यासनास अवगत करावे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)
महाराष्ट्र राज्य, नागपूर करिता

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (सर्व), (कार्य आ. अमरावती)
कार्यात्मक / अकार्यत्मक

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जानेवारी १९९३

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेनिवे १०९१/१६५/सेवा-४.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मध्ये आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, १९९३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम १३० मधील पोटनियम (१) मधील खंड (सी) नंतर खालील परंतुक जोडण्यात यावा :—

"मात्र जेथे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९, च्या नियम १० अन्वये, त्या नियमातील नियम ५ मधील खंड (१) च्या उपखंड (एक), (दोन) आणि (चार) मध्ये नमूद केलेल्या किरकोळ शिक्षांपैकी एखादी शिक्षा बजावण्यासाठी विभागीय चौकशी सुरू केली असेल तेथे शासकीय कर्मचाऱ्यास उपदानाचे प्रदान प्राधिकृत करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ना. कुळकर्णी,
शासनाचे सह सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील विभागांतर्गत असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
वित्त विभागातील सर्व कार्यासने (प्रत्येकी ५ प्रती),
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे